**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Chhatrapati Sambhajinagar – 431 004, Maharashtra, India**
NAAC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
acadsection@bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/संलग्न/पीबीजी/२०२३-२४/ 17022-24 दि. ०४-११-२०२३.

**प्रति,**
**अध्यक्ष / सचिव,**
**[EJ90628] सी.पी. कॉलेज ऑफ एज्युकेशन**
**भक्तनगर, रेवगाव,**
**जालना.**

**विषय:-** **चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार अभिवेदन / खुलासा सादर करणे बाबत.**

**संदर्भ :-** १) डॉ. चेतना सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत चौकशी समितीने सादर केलेला अहवाल दिनांक ०२-११-२०२३.
२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (घ) अन्वये चौकशी समितीचा निष्कर्ष व्यवस्थापनास कळविणेबाबत तरतूद.
३) चौकशी समितीचा निष्कर्ष महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास कळविणेबाबत मा. कुलगुरु महोदयांचे आदेश दि. ०१-११-२०२३.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, **[EJ90628] सी.पी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, भक्तनगर, रेवगाव, जालना** या महाविद्यालयाकडे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०८ अन्वये विहित केल्यानुसार विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयाकडे आवश्यक पायाभूत सुविधाची तपासणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (क) परिच्छेद (०१) अन्वये तसेच शासन निर्णय दिनांक २७ मे, २०१३ नुसार कार्यवाही तसेच, कलम ९७ अन्वये महाविद्यालय व विकास समिती इत्यादी व तत्सम कारणामुळे महाविद्यालयाकडे आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध आहे किंवा कसे? या बाबतची पाहणी / तपासणी करण्यासाठी नियमामध्ये विहित केल्यानुसार उक्त प्रकरणी संबंधित महाविद्यालयांना पत्राद्वारे कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी दिलेल्या माहितीच्या आधारे माहितीचे अवलोकन / चौकशी करणेबाबत समिती गठीत करण्यात आली होती.

संदर्भ १ अन्वये समितीने आपला अहवाल सादर केला असून सदरील पायाभूत सुविधा परीक्षण समितीने आपल्या महाविद्यालयामध्ये चौकशी दरम्यान सोबत जोडलेल्या अभिप्रायाप्रमाणे निष्कर्ष सदरील चौकशी समितीने विद्यापीठास सादर केलेला असून तद्अनुषंगाने **दिनांक १३-११-२०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत आपले म्हणणे तात्काळ शैक्षणिक विभाग (संलग्न) यांना सादर करण्यात यावे. उक्त प्रकरणी विहित मुदतीत समितीने नोंदविलेल्या निष्कर्षानुसार आपण खुलासा सादर न केल्यास, आपले काहीही म्हणणे नाही, असे ग्राहय धरुन नियमामध्ये विहित केल्यानुसार पुढील यथायोग्य कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया गांभीर्याने नोंद घेण्यात यावी. आपल्या सुलभ संदर्भासाठी चौकशी समितीचा अहवालातील निष्कर्ष मुद्दे सोबत जोडलेले आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे.

**उपकुलसचिव**
(शैक्षणिक विभाग)

प्रतिलिपी-

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्वीय सहायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव.
२. मा. प्र कुलगुरू महोदय यांचे स्वीय सहायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव.